# स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना :-

१) स्वयं सहाय्यता बचत गटाला व त्या गटातील सर्व सभासदांना प्रत्येकी रु. ५ /- बँकेत भरणा करुन नाममात्र सभासद करुन घ्यावे लागेल. (गटातील सभासद यापुर्वी बँकेचे नाममात्र सभासद झालेले असल्यास त्यांना नाममात्र सभासद व्हायची आवश्यकता राहणार नाही)

२) स्वयं सहाय्यता बचत गटाला रु. २५,००० /- कॅश क्रेडीट मर्यादा दिल्यानंतर गटाने ४ पट जमा / नांवे व्यवहार केलेला पाहिजे.

३) बचत गटाला मध्यम मुदती कर्जाची उचल देण्यापुर्वी रु. २५,०००/- चे कॅश क्रेडीट खाते '' निरंक'' करावे लागेल.

४) स्वयं सहाय्यता बचत गटाला रु. २५,०००/- कॅश क्रेडीट मर्यादा उचल करुन कमीत कमी ६ महिने पुर्ण झाल्यानंतर गटाचे व्दितीय मुल्यमापन (2 nd Gradation ) बँकेचे शाखाधिकारी/निरीक्षक व पंचायत समितीचे संवर्ग अधिकारी / विस्तार अधिकारी यांनी संयुक्तपणे करावयाचे आहे व सदर गटाला मध्यम मुदती कर्ज मागणी अर्ज (गृप लोन) श्रेणी करणांत (मुल्यमापनात) कमीत कमी १५० गुण प्राप्त होणे आवश्यक राहील.

५) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजने अंतर्गत गटामध्ये सामान्यता १० ते २० सदस्याच्या अंतर्भाव राहील. ओसाड, पहाडी, पसरट क्षेत्र, विरळ लोकसंख्येचे क्षेत्र व लघु सिंचन ( Minor Irigation) आणि विकलांगाच्या बाबतीत गटाच्या सभासदांची संख्या ५ ते २० राहु शकेल. राज्यस्तरीय स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना समिती त्या कठीण क्षेत्राची निवड करुन सदस्यांच्या संख्येत कमी जास्त करणेबाबत सुट दिल्यानंतरच त्या गटाला पात्र समजण्यांत येईल.

६) एस. जी. एस. वाय. अंतर्गत गटामध्ये सर्व सदस्य दारिद्रय रेषेखालील असतात. तथापी आवश्यकतेनुसार अधिकतम २० टक्के व अतितटीच्या वेळी गरज भासल्यास अधिकतम ३० टक्के सदस्य हे दारिद्रय रेषेच्या वरचे असु शकतील. (जर त्यांचे सभासदत्व दारिद्रय रेषेखालील सभासदांना मान्य असेल तर ) यामुळे शेतमजुर आणि कारागीर जे दारिद्रय रेषेच्यावर आहेत, अशांना मदत होईल. परंतु बि. पी. एल. यादीत समाविष्ट नसलेल्या सभासदांना सदर योजनेखाली प्राप्त अनुदानास पात्र राहणार नाही.

७) बचत गटातील सभासद व त्यांच्या कुटूंबातील सभासद कोणत्याही बँकेचा थकबाकीदार नसावा. गटातील सर्व सभासदांना इतर बँकेचे / सेवा सहकारी संस्था / आ. वि. का. व बलुतेदार संस्था यांचे ना-देय प्रमाणपत्र बँकेला सादर करावे लागेल.

८) बचत गटाचे श्रेणीकरण झाल्यानंतर ' अ ' किंव ' ब ' श्रेणीत असणारे बचत गटाचे अर्ज पंचायत समितीकडुन शिफारस होऊन शाखेला प्राप्त झाल्यानंतर शाखास्तरावरुन सर्व कागदपत्रांची तपासणी करुन घ्यावी. नंतर प्रामुख्याने बिपीएल नंबरची खात्री करुन घ्यावी. रहिवासी दाखला, गटाचा ठराव, व्दितीय श्रेणीकरण मुल्यमापन अहवाल, इतर बँकेचे ना-देय प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे कर्ज प्रस्ताव सोबत जोडलेली आहे याची खात्री करुन घ्यावी.

९) बचत गटाचे कर्ज प्रस्ताव शाखा स्तरावर प्राप्त झाल्यानंतर शाखाधिकारी / निरीक्षक यांनी गटाची प्रत्यक्ष भेट घेऊन गटाची सभा आयोजित करावी. गट ज्या व्यवसायासाठी कर्ज घेणार आहे त्याबाबत त्याची संमती असल्याबाबत त्याची खात्री करुन घ्यावी. गटाने व्यवसायासाठी जागा/स्थळ निवडले असल्यास त्याचा तपशिल सादर करावा. गटाची नियमीत बचत, अंतर्गत कर्ज वाटप वसुली, गटाची नियमीत सभा, गटाचा जमाखर्च, इतिवृत्त, हिशेब इत्यादी रेकॉर्ड बरोबर ठेवलेला आहे कां. ? याची खात्री करुन घ्यावी. व बँकेनी पुरविलेल्या कर्ज मागणी अर्जाची माहिती बरोबर असल्याची खात्री करुन घ्यावी.

१०) गट कर्ज घेण्यांस सक्षम असल्यास व कर्ज मागणी अर्जासोबत आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्राची पुर्तता केल्यानंतरच शाखास्तरावरुन सविस्तर अहवाल शिफारशीसह मुख्यालयास मंजुरीकरीता सादर करावा.

११) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत बचत गटांना कोणत्याही व्यवसायासाठी कर्ज मंजुर करतांना त्या व्यवसायाला त्या परिक्षेत्रात वाव आहे काय ? बाजारपेठ व इतर परिस्थितीचा विचार करुन कर्ज मंजुर करण्यांत येईल.

१२) बचत गटाला कर्ज मागणी प्रकरणासोबत संबंधीत व्यवसायाचे/उद्योगाचे प्रकल्प अहवाल (Project Report) बँकेला सादर करावे लागेल.

१३) धान्य खरेदी विक्री/खताचा व्यवसाय/किटकनाशके/मिश्र व्यवसाय व इतर व्यवसाय करण्याबाबत ग्राम पंचायत तसेच संबंधीत विभागाकडुन व्यवसाय परवाना प्रमाणपत्र बचत गटाला बँकेला सादर करावा लागेल.

१४) हत्यारे अवजारे, मशीनरी व इतर यंत्रसामुग्री करीता कर्ज मागणी अर्जासोबत अधिकृत विक्रेत्याचे कोटेशन बँकेला सादर करावे लागेल.

१५) म्हैसपालन/गायी/बकरीपालन या व्यवसायाकरीता कर्ज मंजुर करतांना नाबार्डने दिलेल्या युनिट कास्ट प्रमाणे कर्ज मंजुर करण्यात येईल.

१६) कर्ज वाटपापुर्वी गटातील सर्व सभासदांना संबंधीत व्यवसाय/उद्योगा संबंधी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा/पंचायत समितीकडुन प्रशिक्षण घ्यावे लागेल. प्रशिक्षण पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

१७) जनावरे खरेदी करतांना पशु वैद्यकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१८) कर्जातुन खरेदी केलेल्या गाई/म्हैस व शेळ्यांचे व इतर साहित्याचा विमा, गट व बँक यांचे संयुक्त नावांने काढावा लागेल व सदर विमा पॉलीसी बँकेत ठेवावी लागेल. तसेच दरवर्षी स्वखर्चाने सदर विम्याचे नुतनीकरण करावे लागेल. गटाने मुदतीच्या आंत सदर विम्याचे नुतनीकरण न केल्यास बँक परस्पर विम्याचे नुतनीकरण करुन घेईल. त्याकरीता लागणारी रक्कम गटाचे कर्ज खात्याला नावे लावण्यात येईल. विम्याचे नुतनीकरण करणे व नुकसान झाल्यास विमा कंपनीकडे बँकेच्या मार्फतीने क्लेम नोंदविने व त्याकरीता आवश्यक दस्तऐवज तयार करण्याची जबाबदारी गटाची राहील.

१९) एस. जी. एस. वाय. अंतर्गत बचत गटांना म्हैसपालन किंवा बकरीपालन या व्यवसायाकरीता कर्जवाटप करतांना कर्जाची रक्कम गटाच्या सेव्हींग खात्याला जमा करण्यांत यावी. यंत्रसामुग्री व हत्यारे अवजारे या करीता कर्जवाटप करतांना मंजुर झालेल्या कोटेशननुसार कोटेशन धारकास डी.डी. व्दारे रक्कम अदा करण्यात यावी.

२०) कर्ज वितरण करतांना गटाकडुन वचनचिठ्ठी, करारनामा, कंन्टीन्युटी गॅरंटी बॉन्ड इत्यादी आवश्यक कागदपत्रे भरुन घ्यावे.

२१) बचत गटांना थेट मुदती कर्ज वाटप झाल्यास त्याची नोंद जनरल लेजरला "एस. जी. एस. वाय" अंतर्गत बचत गटाला मध्यम मुदती थेट कर्जवाटप" ह्या नावांने नोंदी घेण्यांत याव्या.

२२) सदर कर्जावर व्याजाचा द. सा. द. शे. १२ टक्के राहील. कर्जाचा हप्ता थकीत झाल्यास थकीत रक्कमेवर १ टक्का दंड व्याज आकारण्यात येईल.

२३) बचत गटाला दिलेल्या कर्जाचा परतफेडीचा कालावधी ५ वर्षाचा राहील.

२४) महिला बचत गटाला कर्ज वसुलीचा नियमीत हप्ता बँकेस व्याजासह भरणा केल्या जाईल. याबाबत महिला बचत गटास सर्व सभासदांच्या सहीनिशी निर्धारीत नमुन्यात करारनामा करुन द्यावा लागेल. पुरुष व मिश्र बचत गटांना मात्र रु. १०० /- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल.

२५) सदर योजनेअंतर्गत बचत गटाला प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के जास्तीत जास्त रु. १,२५,००० /- (प्रती सभासद रु. १०,००० /-) याप्रमाणे अनुदान रक्कम देय राहील. तथापी लघु सिंचन ( Minor Irrigation) अंतर्गत असणाऱ्या बचत गटाकरीता अनुदानाची मर्यादा राहणार नाही.

२६) एस. जी. एस. वाय. योजनेअंतर्गत बचत गटाच्या नावाने मिळणारी

अनुदानाची रक्कम त्यांचे कर्ज खात्याला जमा न करता बचत गटाच्या नावाने " सबसिडी रिझर्व फंड खाते " बचत गट निहाय जमा करण्यांत यावी. शाखांनी " सबसिडी रिझर्व्ह फंड अकौंट्स " या खात्याचे रजिस्टर खालील प्रमाणे दिलेल्या नमुन्यात शाखेनी वेगळे ठेवावयाचे असुन, त्यातील नोंदी अद्यावत ठेवावयाची दक्षता शाखाधिकारी ह्यांनी घ्यावयाची आहे. सदर रजिस्टरची तपासणी मुख्यालयाचे वरीष्ठ अधिकारी / विभागीय अधिकारी यांचेकडुन वेळोवेळी केली जाईल याची नोंद घ्यावी.

२७) बचत गटास देण्यात आलेल्या मुद्दल कर्जावर व्याज आकारणी करतांना अनुदानाची रक्कम वजा करुन उर्वरीत मुद्दल कर्ज रक्कमेवर व्याज आकारणी करावयाची आहे.

२८) बचत गटाला केलेल्या एकुण कर्ज वाटपाच्या रक्कमेतुन अनुदान रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कमेचे मंजुर कालावधीचे समान हप्ते पाडण्यात यावे व अनुदानाची रक्कम शेवटच्या दोन हप्त्यात दाखविण्यात यावी.

उदाहरणार्थ :-

| | | |
|---|---|---|
| १) | गटाचें नांव :- | अबक |
| २) | सभासद संख्या :- | १२ |
| ३) | व्यवसाय :- | म्हैसपालन |
| ४) | कर्ज मंजुर रक्कम :- | रु. २,४०,००० /- |
| ५) | कर्जवाटप :- | रु. २,४०,००० /- |
| ६) | प्राप्त अनुदान रक्कम :- | रु. १,२०,००० /- |

(बिपीएल सभासदाला प्रती सभासद रु. १०,००० /- प्रमाणे अनुदान रक्कम प्राप्त होईल तथापी गटामध्ये नॉन बिपीएल सभासद असल्यास त्या सभासदाला अनुदान रक्कम प्राप्त होणार नाही.

७) परतफेडीचा कालावधी :- ५ वर्ष

| | |
|---|---|
| पहिले वर्ष ( पहिली किस्त) :- | रु. २४,००० /- |
| दुसरे वर्ष ( दुसरी किस्त) :- | रु. २४,००० /- |
| तिसरे वर्ष ( तिसरी किस्त) :- | रु. २४,००० /- |
| चौथे वर्ष ( चौथी किस्त) :- रु. २४,०००/-+रु. ६०,०००/- (अनुदान) = | रु. ८४,००० /- |
| पाचवे वर्ष (पाचवी किस्त) :- रु. २४,०००/-+रु. ६०,०००/- (अनुदान) = | रु. ८४,००० /- |
| | एकुण रु. २,४०,००० /- |

व्याजाची आकारणी रु. २,४०,००० /- कर्जवाटप रक्कमेतुन रु. १,२०,००० /- अनुदान रक्कम वजा जाता रु. १,२०,००० /- या रक्कमेवरच व्याजाची आकारणी करण्यात यावी.

२९) नाबार्डने निश्चित केलेल्या लॉकइन पिरेडचे (Lockin Period) आंत गटाने कर्जाची पुर्ण परतफेड केल्यास गटास अनुदान रक्कम उपलब्ध होणार

नाही. ( बचत गटाला दिलेल्या कर्जाची वसुली निर्धारीत कालावधीत परतफेड केल्यानंतरच अनुदानाची रक्कम त्यांचे कर्ज खात्याला जमा करण्यात येईल.) याबाबतची माहिती परिपत्रकासोबत जोडलेले आहे.

३०) बचत गटाला कर्ज वाटप झाल्यानंतर १ महिण्यांच्या आंत कर्ज विनियोग दाखला (Utilization Certificate) मुख्यालयास सादर करावे.

३१) बचत गट कर्ज मागणी अर्ज शाखेला प्राप्त झाल्यानंतर प्रकरणाची छाननी करुन १० दिवसाच्या आंत कर्ज प्रकरण शिफारशीसह मुख्यालयाला सादर करावे.

३२) बचत गटाला दिलेल्या क र्जाचा गटाने/गटातील सभासदांनी गैरवापर केल्यास कर्जाची एकमुस्त वसुलीची कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार बँकेला राहील.

३३) बचत गटाला दिलेल्या कर्जाची वसुली निर्धारीत हप्त्यात व निर्धारीत कालावधीत नियमीत परतफेड केल्यानंतरच अनुदानाची रक्कम त्याचे कर्ज खात्याला जमा करण्यांत येईल.

३४) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा / पंचायत समिती / स्वयंसेवी संस्था / यांना बचत गटाचे कर्ज वसुलीसाठी बँकेला सहकार्य करावे लागेल.

३५) एस. जी. एस. वाय. अंतर्गत बचत गटांना दिलेले कर्ज गटाचे बँकेने दिलेल्या निर्धारीत कालावधीत नियमित परतफेड न केल्यास किंवा कर्जाचा दुरुपयोग केल्यास थकित कर्ज किंवा थकित झाल्यास किंवा खाते एन.पी.ए. झाल्यास शाखाधिकारी/निरीक्षक यांनी गटातील सभासदांशी भेट घेऊन वसुली करण्याबाबत प्रयत्न करावे.याबात बचत गटाशी लेखी पत्र व्यवहार करावा. याकरीता गट स्थापन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेच्या (एन.जी.ओ.) प्रतिनिधींचे सहकार्य घ्यावे. हे सर्व प्रयत्न करुनही वसुली झाली नाही तर संबंधीत गटास " आपणास मिळणाऱ्या अनुदानाची रक्कम रद्द का करण्यात येवु नये " अशी कारणे दाखवा नोटीस बचत गटाला द्यावी. पण वसुली देण्याबाबत प्रतिसाद मिळाला नाही तर शाखेने केलेल्या कार्यवाहीची माहिती जिल्हा स्तरीय समन्वय समिती (डी.एल.सी.सी.) ह्यांना कळवुन बचत गटाची अनुदान रक्कम कर्ज खाते जमा करण्याची परवानगी प्राप्त करण्याकरीता यासंबंधीत असणारे कागदपत्रासहीत प्रकरण तयार करुन मुख्यालयाला पाठवावे. जिल्हास्तरीय समन्वय समितीची मंजुरी प्राप्त होताच शाखेने गटाचे कर्जापोटी अनुदान रक्कम गटाच्या कर्ज खात्याला जमा करण्यात यावी.

३६) वरील अटीशिवाय एस.जी.एस. वाय. अंतर्गत नाबार्ड / रिझर्व बँक / महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांनी वेळोवेळी घातलेल्या अटी बचत गटास बंधनकारक राहील.

३७) एस.जी.एस.वाय बचत गट कर्ज मागणी अर्ज फाईल मुख्यालयातुन प्राप्त करुन घ्यावी.